**कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे), इमारत परवानगी कक्ष, बृहन्मुंबई क्षेत्र,**
**खोली क्र. ३९-४१, तळमजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०००५१.**

**जा.क्र.: का.अ. (पू.उ.)/इपक/बृ.क्षे./म्हाडा/ET-1824 /२०२३**
**दिनांक :-** 31 OCT 2023

ITC Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: 3036
Date: 01.11.2023

**प्रति,**
मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, म्हाडा,
पहिला मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**विषय :-** पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथील इमारत क्र. **१४१, पंतनगर ओम निवास सह.गृह.नि.संस्था मर्या.,** न.भू.क्र. ५७४० (भाग), पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७५ या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत.

**संदर्भ :-**
१. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.टीपीएस-१८२०/अ नै २७/ प्र.क्र. ८०/२० नवि-१३, दि. १४.०१.२०२१.
२. म्हाडा परिपत्रक क्र. एम.एच./मुं.मं.-२/उप. मुख्य अ./इ.प.क./बृ.क्षे./प्रा./ ईटी-४५४/२०२१, दि. २३.०२.२०२१.
३. या कार्यालयाचे Amended Plan मंजूरी पत्र क्र. MHADA- ०१/५५९/२०२२ दि. १०.०२.२०२२.
४. विकासक, मे. गुरुकृपा रियलकॉन डेव्हलपर्स प्रा.लि., यांचे दि. ३०.१०.२०२३ रोजीचे पत्र व हमीपत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाला अनुसरुन संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्र. २ च्या म्हाडा प्राधिकरणाच्या परिपत्रकान्वये विषयांकित प्रकल्पाकरिता विकासकाला पुनर्विकास इमारतीच्या आराखड्यांना मंजूरी देताना फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकाकरीता आकारण्यात आलेल्या अधिमुल्य रक्कमेकरिता मे. गुरुकृपा रियलकॉन डेव्हलपर्स प्रा.लि., यांना ५०% सुट देण्यात आलेली आहे. या पुनर्विकास प्रकल्पातील EWS/LIG/MIG/HIG क्षेत्रातील घरे/सदनिका/वाणिज्यिक-औद्योगिक इतर गाळे घेणाऱ्या ग्राहकांना देय मुद्रांक शुल्काचा भरणा विकासक (मे. गुरुकृपा रियलकॉन डेव्हलपर्स प्रा.लि., ) यांनी करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर योजनेचा लाभ विकासकांना देण्यात आलेला आहे.

विषयांकित इमारतीच्या पुनर्विकासाच्या आराखड्यांना मंजूरी देताना विकासक मे. गुरुकृपा रियलकॉन डेव्हलपर्स प्रा.लि., यांना दि. १४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण **१२७५.३० चौ.मी.** (निवासी वापर) करिता फंजिबल अधिमुल्य रकमेवर ५०% सुट देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने विकासकांनी **१३२१.८३ चौ.मी.** (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या २३ सदनिकांच्या मुद्रांक शुल्कचा भरणा करण्यासंबंधी खालील बाबींची पुर्तता करावयाची आहे.

I. या योजनेमध्ये सहभागी होवू इच्छिणाऱ्या प्रकल्पांकरीता संबंधित विकासकाने ग्राहकांचे पूर्ण मुद्रांक शुल्क भरण्यात येणार असल्याचे हमीपत्र नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

II. अशा प्रकल्पामधील मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासकामार्फत करण्यात आला असल्याने लाभार्थी ग्राहकाचे प्रमाणपत्र विकासकास नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

III. विकासकाने ज्या ग्राहकांच्या अशा प्रकारे मुद्रांकांचा संपूर्ण खर्च केला आहे, त्यांची यादी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी लागेल.

IV. जे प्रकल्प या योजनेत सहभागी होतील त्या प्रकल्पांची अथवा प्रकल्पांच्या ज्या भागासाठी सवलत घेतली आहे त्याची यादी, महानगरपालिका आयुक्त / नगरपरिषद अथवा नगरपंचायत मुख्याधिकारी / जिल्हाधिकारी / नियोजन प्राधिकरण यांच्यामार्फत माहितीकरीता मुद्रांक नोंदणी कार्यालयास कळवावी लागेल. तसेच संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करावी लागेल.

त्यानुसार विकासकांनी **१३२१.८३ चौ.मी.** (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या २३ सदनिकांच्या मुद्रांक शुल्कचा भरणा करणे आवश्यक आहे. सदर इमारतीत विकासकामार्फत १९ सदनिकांची विक्री करण्यात आली आहे. सदर १९ सदनिकांच्या विक्री कराराकरीता मुद्रांक शुल्काचा भरणा विकासकाने केल्याबाबत हमीपत्र सादर केले आहे. विकासकाने १९ सदनिकांचे सह दुय्यम निबंधक, कुर्ला २ व कुर्ला ३ यांचेकडे विक्री करारनामा नोंदणी केलेल्या ग्राहकांचे प्रमाणपत्र व सूची क्र. २ या कार्यालयाकडे सादर केलेली आहे. सदर १९ सदनिकांचा तपशील खालील प्रमाणे असून सोबत परिशिष्ट-अ मधील माहिती म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**सोबत :-** परिशिष्ट-अ

आपला विश्वासू,

कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष / म्हाडा

**प्रत :-** मा. उपमुख्य अभियंता / इपक / प्रा. यांना माहितीकरीता.

# <u>परिशिष्ट - अ</u>

पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथील इमारत क्र. **१४१, पंतनगर ओम निवास सह.गृह.नि.संस्था मर्या.,** न.भू.क्र. ५७४० (भाग), पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७५ या इमारतीच्या पुनर्विकासामधील खालील सदनिकांच्या विक्री करारावर मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासक, मे. गुरुकृपा रियलकॉन डेव्हलपर्स प्रा.लि., यांचे मार्फत करण्यात आला आहे. सदर लाभार्थी ग्राहकाची यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदनिका क्रमांक | बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी. | विक्रीबाबत सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| १ | सदनिका क्र. १८०१, विंग ए | ६०.९४ | विक्री करण्यात आलेला नाही |
| २ | सदनिका क्र. १८०२ विंग ए | ३८.१८ | विक्री करण्यात आलेला नाही |
| ३ | सदनिका क्र. १८०३ विंग ए | ८७.७९ | Kavita Shyamlal Rohira यांना विक्री करण्यात आला आहे |
| ४ | सदनिका क्र. १९०१ विंग ए | ६७.०६ | Aarti Praful Shah & Aakash Praful Shah & Praful Shantilal Shah यांना विक्री करण्यात आला आहे |
| ५ | सदनिका क्र. १९०२ विंग ए | ४२.०५ | Praful Shantilal Shah & Aarti Praful Shah यांना विक्री करण्यात आला आहे |
| ६ | सदनिका क्र. १९०३ विंग ए | ८७.७९ | Vijay Chinubhai Shah यांना विक्री करण्यात आला आहे |
| ७ | सदनिका क्र. २००१ विंग ए | ६०.९४ | Saverine A Furtado & Steven A Furtado & Diana C Fernsndes यांना विक्री करण्यात आला आहे |
| ८ | सदनिका क्र. २००२ विंग ए | ४२.०५ | Monil Mukesh Shah & Charmi Monil Shah यांना विक्री करण्यात आला आहे |
| ९ | सदनिका क्र. २००३ विंग ए | ९६.६० | Smit Nimesh Desai यांना विक्री करण्यात आला आहे |
| १० | सदनिका क्र. २०३ विंग बी | ६०.९४ | Vijayashree Nagraj Gukarna यांना विक्री करण्यात आला आहे |
| ११ | सदनिका क्र. १७०२ विंग बी | ६०.०६ | Tejas H Doshi & Arti Tejas Joshi यांना विक्री करण्यात आला आहे |
| १२ | सदनिका क्र. १८०१ विंग बी | ३८.८३ | Mahesh Kheraj Joisar यांना विक्री करण्यात आला आहे |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | सदनिका क्र. १८०३ विंग बी | ६०.९४ | Ami Hemendra Mehta यांना विक्री करण्यात आला आहे |
| १४ | सदनिका क्र. १८०४ विंग बी | ५२.६७ | Rashmi Ratilal Mehta यांना विक्री करण्यात आला आहे |
| १५ | सदनिका क्र. १९०१ विंग बी | ३८.८३ | Rajesh Hemani यांना विक्री करण्यात आला आहे |
| १६ | सदनिका क्र. १९०२ विंग बी | ६०.९४ | Rajesh Hemani यांना विक्री करण्यात आला आहे |
| १७ | सदनिका क्र. १९०३ विंग बी | ६०.९४ | Manish Bhailal Chheda यांना विक्री करण्यात आला आहे |
| १८ | सदनिका क्र. १९०४ विंग बी | ५२.६७ | Sagar Arun Thakkar यांना विक्री करण्यात आला आहे |
| १९ | सदनिका क्र. २००१ विंग बी | ३८.८३ | Jaya Patel & Chintan Patel यांना विक्री करण्यात आला आहे |
| २० | सदनिका क्र. २००२ विंग बी | ६०.९४ | Dilip Bhagat यांना विक्री करण्यात आला आहे |
| २१ | सदनिका क्र. २००३ विंग बी | ६०.९४ | विक्री करण्यात आलेला नाही |
| २२ | सदनिका क्र. २००४ विंग बी | ५२.६७ | विक्री करण्यात आलेला नाही |
| २३ | सदनिका क्र. २०२ विंग ए | ३८.२३ | Vijay B. Pandya & Neeta Vijay Pandya & Tejas Vijay Pandya यांना विक्री करण्यात आला आहे |
| | **एकूण =** | **१३२१.८३** | |

कार्यकारी अभियंता(पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष/म्हाडा